# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २६६ /२०२४ दि. १६/१२/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत घोडबंदर–ठाणे व ठाणे – घोडबंदर वाहीनीवर सर्व्हिस रोड मर्ज करण्याचे काम करण्यात येणार असुन सदर काम करताना सार्वजनिक वाहतूकीस व रहदारीस अडथळा व वाहतूक कोंडी निर्माण होऊन नागरिकांची गैरसोय होत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **नो पार्कींग** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**१) नो पार्किंग करण्यात आलेले ठिकाण :–**

**अ) घोडबंदर ठाणे वाहीनीवर :–**

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार | अंतर |
|---|---|---|---|
| १ | ओमशिव सोसायटी आरमॉल ते ब्ल्यु किचन शॉप पावेतो | नो पार्कीग | ३५० मिटर |
| २ | भारत पेट्रोलपंप मानपाडा ते रुणवाल बि.गेट पावेतो | नो पार्कीग | १०० मिटर |
| ३ | पाटसकर एकलेट सोसायटी ते वाघबिळ ब्रिज पावेतो | नो पार्कीग | ४५० मिटर |
| ४ | वघबिळ नाका ते पातलीपाडा ब्रिज पावेतो | नो पार्कीग | ४५० मिटर |

**ब) ठाणे घोडबंदर वाहीनीवर :–**

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार | अंतर |
|---|---|---|---|
| १ | हारमोनी सोसायटी ते मारुती कार शोरुम पावेतो सर्व्हिस रोड पावेतो | नो पार्कीग | ५०० मिटर |

सदर वाहतूक अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून काम पुर्ण होई पर्यंत लागू करण्यात येत आहे. याबात काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत :–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत :–** सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner